९) श्री.सचिन अरुण सांगळे
वय ३८ वर्षे धंदा— शेती
PAN NO.CBTPS9279P
अनु क्र. ७ ते ९ रा.कल्याणनगरी
सीएचएस एलटीडी सांगळेवाडी
लोकउदयान जवळ कल्याण वेस्ट जि.ठाणे
१०) श्री.योगेश माधव कातकाडे
वय ४२ वर्षे धंदा— शेती
PAN NO.AOKPK4456J
११) रुपाली योगेश कातकाडे
वय ३४ वर्षे धंदा— शेती
PAN NO. GCKPK3393A
१२) श्री.संदिप माधव कातकाडे
वय ४० वर्षे धंदा— शेती
PAN NO.AWPPK8741F
अनु क्र.१०ते १२रा.मु.पो.ओणे ता.निफाड
जि.नाशिक —४२२३०२

.....विकास करारनामा लिहुन घेणार
विकासक /द्वितीय पक्षीय

कारणे विकास करारनामा लिहून देतात व घेतात ते पुढीलप्रमाणे:—

१. तुकडी जिल्हा ठाणे पोट तुकडी ता. अंबरनाथ, जिल्हा परिषद ठाणे यांच्या हद्दीतील तसेच ग्रामपंचायत वांगणी, तलाठी सजा वांगणी, व दुय्यम निबंधक कार्यालय उल्हासनगर—२ यांच्या कार्यक्षेत्रातील मौजे वांगणी,ता. अंबरनाथ जि.ठाणे येथील खालील वर्णनी केलेली मिळकत ही लिहून देणार यांचे नावे सरकार दप्तरी रेकार्डी ऑफ प्रॉपर्टी ७/१२ चे उता—यावर नोंद असून लिहून देणार हे सदरहू मिळकतीचे मालकी हक्काने उत्पन्न उपभोग घेत आहेत. अशा सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :—

The Seal of The Joint Sub Registrar सह दुय्यम निबंधक वर्ग-२, उल्हासनगर-२ सत्यमेव जयते जि. ठाणे Dist. Thane

मिळकतीचे वर्णन

गावाचे नाव	गट नं/हिस्सा नं.	क्षेत्रफळ हे.आर. प्रति	आकार रु.पै.
मौजे वांगणी, ता. अंबरनाथ जि.ठाणे	२४०	१—७९—९० पो.ख ०—१८—४० एकुण १—९८—३० यापैकी लिहुन देणार यांचे हिस्स्याचे क्षेत्र ०—४३—१७पैकी ०—२१—०० लिहुन घेणार यांना विकसना करीता दिले आहे.	३०—३१

सदर मिळकतीच्या चतु: सिमा पुढीलप्रमाणे:—

पूर्वेस :— गट नं.२४१ ची मिळकत

पश्चिमेस:— अमोल शेलार यांची मिळकत

दक्षिणेस:— बेडीसगाव हद्द

उत्तरेस:— विश्वनाथ शेलार यांची मिळकत

Director of Stamps (Maharashtra) Mumbai

The Seal of the Joint Sub Registrar Class-II, Ulhasnagar-4 सह दुय्यम निबंधक वर्ग-२, उल्हासनगर-४ ठाणे क्र. ४ सत्यमेव जयते जि. ठाणे Dist. Thane

उ ह न - ४
दस्त क्र. 10361 २०२२
९४ | ५०

२. येणेप्रमाणे वरील वर्णनाची मिळकत ही लिहून देणार यांचे कब्जे वहिवाटीमध्ये असून ते मालकी हक्काने उत्पन्न उपभोग घेत आहेत. लिहून देणार यांना स्वता: विकसित करावयाची होती परंतू विकसित करण्यासाठी आवश्यक असणारे ज्ञान व पुरेसे भांडवल लिहून देणार यांच्याकडे नसल्याकारणाने लिहून देणार यांनी सदरहू मिळकतीचा विकास करेल व आर्थिक व वास्तुरूपी स्वरूपात मोबदला देईल अशा विकासकास सदरची मिळकत विकसित करण्यास देण्याचे निश्चित केले.

३. सदर पहिले पक्षीय यांच्या इच्छेची कल्पना द्वितीय पक्षीय यांना झाल्यानंतर द्वितीय पक्षीय यांनी सदरहू मिळकतीची पाहणी करुन व पसंत पडलेवरुन विकसित करण्याचे निश्चित केले. अशी वर उल्लेखीत मिळकत ही लिहुन घेणार यांना विकसीत करण्यासाठी निश्चित झाले. विकासकाने सदर मिळकतीची पाहणी करून विकसीत करण्याचे निश्चित केले. त्यासंदर्भात प्रथम पक्षीय यांच्याकडे सदरहू मिळकत विकसित करण्यासाठी देण्यासंदर्भात विचारणा केली. त्याप्रमाणे दोन्हीही पार्टीच्या चर्चेअंती द्वितीय पक्षीय यांनी पहिले पक्षीय यांना देउ केलेल क्षेत्राचा रुपातील मोबदला हा अत्यंत वाजवी व योग्य असल्याने प्रथम पक्षीय यांनी द्वितीय पक्षीय यांना सदरहू मिळकत ही विकसित करण्यासाठी देण्याचे निश्चित झाले. त्यानुसार खालील अटी व शर्तीच्या आधारे प्रथम पक्षीय व द्वितीय पक्षीय यांच्यामध्ये विकास करारनामा करण्याचे निश्चित झाले.

अशा विकासकरारनाम्याच्या ज्या अटी व शर्ती ठरल्या त्या पुढीलप्रमाणे:—

१. लिहून देणार यांना सदरहू मिळकतीची निगा राखणे, अथवा सदरहू मिळकत स्वत: विकसीत करणे शक्य नसल्याकारणाने सदरहू मिळकतीचा विकासीत करण्याचे हक्क विकासकर्त्यांना दिल्यास त्यातून मिळणा—या वास्तुरूपी मोबदल्यातून कुटुंबाची योग्य ती सोय करीता येईल.या हेतुने तसेच सदर इतर अनुषांगिक कारणांमुळे लिहून देणार यांनी सदरहू मिळकतीचे विकास हक्क सदर विकासकर्त्यांना यांना देण्याचे ठरविले. म्हणुन या कराराने लिहून घेणार यांना लिहून देणार यांनी सदरहू मिळकतीचे विकसनाचा हक्क देत आहेत. यांची माहिती मिळाल्यावर लिहून घेणार यांनी लिहून देणार यांची प्रत्यक्ष भेट घेतली व सदरहू मिळकत विकसित करण्यासंदर्भात बोलणी करतेवेळी लिहून देणार यांनी असे जाहिर केले की सदरची मिळकत ही त्यांच्या मालकीची व प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीची आहे.

The Seal of the Joint Sub Registrar सह दुय्यम निबंधक वर्ग-२, उल्हासनगर-४ सत्यमेव जयते जि. ठाणे Dist. Thane

दस्त क्रमांक	२०२२
१५	५०

सदरहू मिळकतीवर अन्य कोणत्याही हक्क, हितसंबंध व अधिकार नाही. द्वितीय पक्ष हे लिहून देणार यांना सदरहू मिळकतीचा विकासाच्या पोटी देवू केलेला मोबदला प्रचलीत बाजार भावाप्रमाणे योग्य व रास्त असल्याची खात्री पटल्यावर व सदरहू मिळकतीचे हक्क कुटुंबाच्या भल्याकरिता उन्नतीकरता असल्यामुळे लिहून देणार यांनी सदरहू मिळकतीचे विकसित हक्क लिहून घेणार यांना देण्याचे मान्य व कबूल केले.

२. सदरहू जमिनीची मिळकत लिहून देणार यांच्या निर्विवाद मालकीची व कब्जे वहिवाटीची आहे. अशी वर उल्लेखलेली मिळकत लिहून देणार यांनी लिहून घेणार यांस विकसित करण्याकरिता दिली आहे आणि म्हणूनच त्याचा मोबदला म्हणुन लिहुन घेणार विकासक यांनी ग्रामपंचायत वांगणी /जिल्हाधिकारी ठाणे /नगर रचना विभाग यांच्याकडून मंजुर होणा—या एकुण बांधकामापैकी १११२४ चौ. फु कारपेट सदनिकांचे स्वरुपात लिहुन देणार मालक यांना बांधून दयावयाच्या आहेत. सदरचे बांधकाम हे आर.सी.सी. आणि सर्व बेसीक सोयी सुविंधायुक्त असेल.व लिहुन देणार यांना त्यांचा हिस्सा दिल्यानंतर उर्वरीत सर्व मंजुर बांधकामावर सर्व सदनिकांवर लिहुन घेणार यांचा अधिकार राहिल याची जाणीव लिहुन देणार यांना आहे.

उहन - ४
दस्त क्र ७३६५ २०२२
९६ ५०

३. सदर मिळकत सर्वतोपरी विकसित केल्यानंतर लिहून देणार यांना दयावयाचे एकुण बांधकामापैकी १११२४ चौ. फु कारपेट सदनिकांचे स्वरुपात लिहुन देणार मालक यांना बांधून दयावयाच्या आहेत. सदरचे बांधकाम हे आर.सी.सी. आणि सर्व बेसीक सोयी सुविंधायुक्त असेल. लिहुन घेणार यांना लिहुन देणार हे त्यांचे हिश्श्यास आलेल्या सदनिकांचे ताबा घेताना विकसन शुल्क म्हणजे डेव्हलपमेंट चार्च देणार नाहीत यांची जाणीव लिहुन घेणार यांना आहे.

४. सदर मिळकतीची जिल्हाधिकारी यांचे कडुन बिनशेती परवानगी व सक्षम प्राधिकरणा कडुन बांधकाम परवानगी तसेच प्रत्यक्ष बांधकाम चालु करण्याची परवानगी मिळाल्यापासून ३६ महिन्याच्या मुदतीत लिहुन देणार यांचा बांधकाम रुपी मोबदला देण्याचा निश्चित झाले आहे. तशी हमी व्दितीय पक्षीय हे या करारनाम्याद्वारे देत आहेत. तसेच प्रथम पक्षीय यांच्या हिस्याला आलेल्या सदनिका हया प्रथम पक्षीय हे स्वत:च्या वापरासाठी ठेवू शकतात अथवा त्याची विक्री इच्छूक खरेदीदार व्यक्तिला करू शकतात.

४. प्रथम पक्षीय हे द्वितीय पक्षीय यांस असे अभिवचन देत आहेत की,

अ. लिहुन देणार हेच सदर मिळकतीचे एकमेव मालक असुन हा करार करण्याचा लिहून देणार यांना पूर्ण हक्क, व अधिकार आहे तसेच त्यांच्याशिवाय इतर कोणासही सदर मिळकतीमध्ये हक्क, मालकी व हितसंबंध नाहीत व तसे न आढळून आल्यास व त्यामुळे व्दितीय पक्षीय यांना काही तोशिष लागल्यास त्याची भरपाई प्रथम पक्षीय करतील.

आ. प्रथम पक्षीय यांनी सदरहू मिळकतीसाठी किंवा तिच्या कोणत्याही भागासाठी जमिन विकसित करण्याचा किंवा विकास हक्क हस्तांतरित करण्याचा अथवा अन्य कोणत्याही स्वरूपाचा विक्री इत्यादीचा करार किंवा अन्य कोठल्याही प्रकारे लिखाण अन्य कोणत्याही व्यक्तीबरोबर केलेला नाही तसेच कोणत्याही लाभांत कुलमुखत्यार पत्रही लिहून दिलेले नाहीत व सदरच्या मिळकती चोख, निर्विवाद व बोजेविरहीत अशी आहेत.

दस्त क्र 03814 2022

इ. प्रथम पक्षीय यानी सदरहू मालमत्तेसाठी अन्य कोणत्याही व्यक्तीबरोबर / व्यक्तीसाठी प्रतिकूल किंवा विरुध्द हक्क निर्माण केलेला नाही. विकासकार्यास हरकत बाधा येईल असे कोणतेही कृत्य केलेले नाही.

ई. सदरहू मिळकतीबाबत आजतागायत कोणत्याही प्रकारचा ॲक्वीझिशन अथवा रिक्वीझिशनच्या नोटीसा प्रथम पक्षीय यांना आलेल्या नाहीत. व आजतागायत सदरहू मिळकतीवर प्रथम पक्षीय यांचीच निरंतर कब्जा वहिवाट आहे. सदर मिळकतीवर अन्य कोणाचाही ताबा अथवा कब्जेवहीवाट नाही कुळ अथवा अन्य वहिवाटीचे हक्क नाहीत.

उ. सदरहू मिळकती हया कुठल्याही वादाचा विषय नसून सदरहू मिळकतीसंदर्भात कुठल्याही प्रकारचा वाद तंटा नाही किंवा सदरहू मिळकतीबाबत कुठलेही प्रकरण न्यायप्रविष्ठ नाही व प्रथम पक्षीय यांच्या व्यतिरिक्त इतर कोणासही सदरहू मिळकतीत हक्क हितसंबंध नाहीत.

ऊ. सदरहू मिळकती कडे जाण्यायेण्यासाठी रस्त्याची सोय लिहुन घेणार यांनी स्वखर्चाने केलेली आहे.सदर रस्ता फक्त लिहुन देणार व सदर मिळकतीचे लगतचे भुधारक श्री भानुदास नारायण शेलार यांनी वापरणेचा आहे. या व्यतिरिक्त इतर कोणतीही व्यक्ती, कंपनी, संस्था यांना सदरचा रस्ता वापरायचा असल्यास लिहुन घेणार यांची लेखी परवानगी घेणे बंधनकारक असणार आहे याची जाणीव लिहुन देणार यांना आहे.

उ ह न - ४
दस्त क्र. 0384 २०२२
9C 90

ए. सदरहू मिळकतीसंबंधी लिहून देणार यांच्यातर्फे कोणताही वाद हरकत व तंटा बखेडा प्रस्थापित केल्यास तसेच लिहून घेणार राबवित असलेल्या विकसनकार्यात कोणताही अडथळा निर्माण झाल्यास त्याचे निराकरण लिहून देणार हे स्वखर्चाने करुन देतील. अशा तरेनी कोणतेही वाद उत्पन्न झाल्यास ते मिटवण्याकरीता लागणारा कालवधी तसेच अशा वादांमुळे बांधकाम परवानग्या काही कालवाधी करीता स्थगीत झाल्यास असा कालावधी पहीले पक्षीय यांना दयावयाच्या बांधकाम कालावधी मध्ये गणला जाणार नाही. म्हणजेच या कालावधीकरीता लिहुन देणार यांना दयावयाच्या बांधकाम देण्याच्या कालावधीत तेवढया मुदतीने आपोआप वाढ झालेली आहे असे समजण्यात येईल.

५. सदर लिहून घेणार यांना सदरहू मिळकत कायदेशीररित्या सरकारी नियमांचे पालन करुन विकास करण्यासाठी दिलेली आहे. त्यामुळे लिहून घेणार यांनी कायदेशीर बाबींची पूर्तता करुन सदरहू मिळकत विकसित करण्याची आहे. परंतू लिहून घेणार यांनी जर कायदेशीर नियमांचे पालन करुन जर सदरची मिळकत विकसित केली नाही तर त्याकामी काही कायदेशीर कारवाई झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी लिहून घेणार यांचीच आहे व राहील.

प्रथम पक्षीय यांनी द्वितीय पक्षीय यांस सदरहू मिळकतीचा निर्विवाद कब्जा या करारावर सहया करताना साक्षीदारा समक्ष प्रत्यक्ष जागेवर जाउन मिळकत विकसित करण्यारिता दिलेला आहे. तसेच द्वितीय पक्षीय यांना जागेवर जाण्यायेण्याचे हक्क व मिळकत विकसित करण्याचे हक्क देण्याचे मान्य व कबूल आहे व त्यानुसार व्दितीय पक्षीय यांस सदर मिळकतीचे विकासन कार्य पुर्ण करण्याच्या दृष्टीने त्या जागेवर त्यांचे प्रतीनीधी, कामगार, अभियंता, वास्तुशिल्पकार, कायदेशीर सल्लागार वैगेरे तसेच आर्थिक मदत करणारे प्रतिनिधी, मित्र,आप्त नातलग यांना वेळोवेळी जागेवर आणण्याचा व जागेवर विकसित कार्य राबविण्याचा पूर्ण हक्क आहे व राहील त्यास लिहून देणार यांनी कोणतीही हरकत घ्यावयाची नाही.

६. या कराराने प्रात्प झालेले सर्व हक्क व अधिकार द्वितीय पक्षीय यांना सदरहू मिळकत ही कोणत्याही ति–हाईक इसमांस भागीदारी संस्थेस विकास हक्क विकत अथवा विकासाचे हक्क हस्तांतरण करण्याचे अधिकार आहे व राहील. परंतु असे हक्क अधिकार हस्तांतरित करताना एकुण बांधकामापैकी १११२४ चौ. फु कारपेट सदनिकांचे स्वरुपात लिहुन देणार मालक यांना बांधून दयावयाच्या आहेत. सदरचे बांधकाम हे आर.सी.सी. आणि सर्व बेसीक सोयी सुविधायुक्त असेल उर्वरीत बांधकाम अथवा शिल्लक एफ.एस. आयची द्वितीय पक्षीय विक्री अथवा विकास हक्क हस्तांतरित करु शकतील.

७. सदरहू मिळकतीच्या टायटलबाबत तसेच कब्जाबाबत प्रथम पक्षीय यांच्यातर्फे कोणीही वाद निर्माण झाल्यास त्याचे निराकरण प्रथम पक्षीय हे स्वखर्चाने करुन घेतील.

The Seal of The Joint Sub Registrar Class-II, Ulhasnagar-4 Dist. Thane
सह दुय्यम निबंधक वर्ग-२, उल्हासनगर-४ जि. ठाणे
सत्यमेव जयते

उहन - ४
दस्त क्र ७३८ २०२२
20 | ५०

८. उभय पक्षांत असे ठरले की जर भविष्यात सदरहू मिळकतीसंबंधी मिळकतीवर कोणतेही वाढीव चटईक्षेत्र, स्टेअरकेस एफ. एस. आय) उडते चटई क्षेत्र निर्देशांक वापरण्याची परवानगी प्राप्त झाल्यास असे सर्व (एफ.एस.आय) व टी.डी.आर वर अधिकार लिहून घेणार यांचा राहील.

९. सदरच्या मिळकतीवर ग्रामपंचायत वांगणी च्या, नियमानुसार अन्य कुठल्याही मिळकतीचे उडता चटई क्षेत्र निर्देशांक (टी.डी.आर.) उपलब्ध झाल्यास ती सदरहू मिळकतीवर वापरण्याचे हक्क प्रथम पक्षीय यांनी द्वितीय पक्षीय यांना दिलेले आहेत.

१०. उभय पक्षांत असे ठरले की, सदरहू मिळकतीवर नकाशा मंजूर झाल्यावही व मिळकतीवर विकसित कार्य राबवितेमुळे किंवा विकसित कार्य संपूर्ण झाल्यावरही जर शासनाच्या नगररचना विभाग संबंधित सक्षम प्राधिकारी यांच्या हुकुमाने जर सदरहू मिळकतीवर वाढीव (एफ.एस.आय) मंजूर झाल्यास असा वाढीव एफ.एस.आय व त्यांचे लाभ फायदे घेण्याचा हक्क व अधिकार वरील प्रमाणे असेल. वाढीव एफ.एस. आय व इतर फायदे मिळविण्याकरिता लिहून देणार हे कायदयातील संबंधीत तरतुदींची पूर्तता करतील.व त्याकरिता संपूर्ण सहकार्य लिहुन घेणार यांना करतील.

११. लिहून देणार असे जाहिर व उद्घोषित करतात की,सदरहू मिळकतीचा कब्जा वरील प्रमाणे मोबदला स्विकारुन सदरहू कराराअंतर्गत लिहून देणार यांनी लिहून घेणार यांच्या लाभात विकसित हक्काच्या स्वरुपात सोडून दिलेला आहे. व ते यापूढे सदरहू मिळकतीत कोणताही हक्क अधिकार व कब्जा सांगणार / प्रस्थापित करणार नाहीत. तसेच पिकपाण्यासाठी हक्क सांगणार नाहीत. व मिळकतीसंदर्भात कोणत्याही दप्तरी नाव लावलेले नाहीत व यापूढेही लावणार नाहीत व लिहून घेणार हे सदरहू मिळकतीत करणार असलेल्या विकसित कार्यात कोणतीही हरकत घेणार नाहीत.

The Seal of The Joint Sub Registrar Class-II, Ulhasnagar-4 Dist. Thane
दु.नं. - ४
दस्त क्र. 03814 २०२२
29 | 10

. लिहून देणार यांनी संयुक्तरित्या लिहून घेणार यांस सदरहू मिळकतीचा कब्जा लायसेन्सी म्हणून दिलेला आहे. लिहून घेणार यांना जागेवर जाण्यायेण्याचे व सदरहू मिळकतीची प्रायव्हेट सर्व्हे करून अगर सरकारी कार्यालयाकडून पाहणी व मोजणी करण्याचा पूर्ण हक्क व अधिकार आहे. तसेच सदरहू मिळकतीस लिहून घेणार यांना कूंपण किंवा कुंपणाची भिंत घालण्याचा पूर्ण हक्क व अधिकार आहे व अशी मोजणी करताना किंवा कुंपणाची भिंत बांधताना काही अडचणी किंवा तक्रारी आल्यास किंवा अशा अडचणी किंवा तक्रारी बाबतची नोटीस लिहून घेणार यांस मिळाल्यास लिहून देणार त्या ताबडतोब स्वखर्चाने दुर करतील. व त्यांची तोषिस लिहून घेणार यांस लागू देणार नाही. सदरहू मिळकत विकसित करण्याचे व विकंसित कार्य पूर्ण करण्यांच्या दृष्टीने त्या जागेवर त्यांचे प्रतिनिधी अभियंता वास्तुशिल्पकार कायदेशीर सल्लागार, वैगेरे तसेच आर्थिक मदत करणारे प्रतिनिधी मित्रा, आप्त नातलग यांना वेळोवेळी जागेवर आणण्याचा व जागेवर विकसित कार्य राबविण्याचा पूर्ण हक्क आहे व राहील. त्यास लिहून देणार यांनी कोणतीही हरकत घेण्याची नाही.

१३. सदरहू मिळकतीसंबंधी कोणीही वाद तंटा बखेडा उपस्थित त्याचे निराकरण हे लिहून देणार हेस्वखर्चाने व स्वजबाबदारीने करतील. व त्याची तोषिस लिहून घेणार यांना लागू देणार नाहीत उभय पक्षांत असे ठरले की. उपस्थित झालेला वाद, तंटा यांचे जोपर्यंत लिहून घेणार यांच्या मर्जीप्रमाणे निराकरण होत नाही तोपर्यंत लिहून घेणार यांच्यावर मुदतीमध्ये क्षेत्राचा मोबदला देणे बंधनकारक राहणार नाही.

Seal of The Joint Sub Registrar Class-II, Ulhasnagar-2 सह दुय्यम निबंधक वर्ग-२, उल्हासनगर-२

उहन - ४
दस्त क्र. 1364 २०२२
22/30

१४. सदरहू मिळकतीसंबंधी कोणताही वाद अन्नवस्त्रा पोटगी इ. संबंधीच्या कोणाचाही हक्क नाही याची लिहून देणार हे खात्री देत आहेत व यदाकदाचित तसा कोणताही हक्क दावा कोणीही उपस्थित केल्यास त्याची जबाबदारी लिहून देणार यांचेवर राहील व त्यामुळे काही नुकसानी झाल्यास किंवा नुकसान भरपाई दयावी लागल्यास त्यांची संपूर्ण जबाबदारी व हमी लिहून देणार हे घेत आहेत. सदरहू मिळकतीसंबंधी लिहून देणार यांच्या कुटूंबियांमार्फत कोणीही वाद हक्क व दावा उपस्थित केल्यास त्याचे निराकरण होईपर्यत लिहून देणार यांना दयावयाचे बांधकाम देणार नाहीत. हे लिहून देणार यांना मान्य व कबूल आहे. तसेच लिहून देणार यांच्या इतर मिळकतीसंबधी जो काही वाद असेल त्यामुळे सदरहू मिळकतीस व लिहून घेणार यांस कोणत्याही प्रकारची तोषिस लिहून देणार हे येवू देणार नाहीत.

Collector of Stamps

१५. लिहून घेणार यांना सदरहू मिळकत योग्यरित्या विकसित करता यावी त्या योजनेसाठी जरुर ते कागदपत्रे, अस्सल नकला व माहिती वगैरे लिहून देणार यांनी दयावयाची आहे. तसे जे जे कागदपत्रे मिळणार नाहीत ते ते मिळविण्यासाठी लिहून देणार यांनी सहया वगैरे देवून सहकार्य करावयाचे आहे.

१६. लिहून देणार यांनी लिहून घेणार यांस सदरहू मिळकतीचा निविर्वाद कब्जा मिळकत विकसित करण्याकरिता दिलेला आहे. व लिहून घेणार यांना जागेवर जाण्यायेण्याचे हक्क व मिळकत विकसित करण्याचे मान्य व कबूल आहे व त्यानुसार लिहून घेणार यांस विकसनाचे कार्य पूर्ण करण्याच्या दृष्टीने त्या जागेवर त्यांचे प्रतिनिधी अभियंता वास्तुशिल्पकार कायदेशीर सल्लागार वैगेरे तसेच आर्थिक मदत करणारे प्रतिनिधी मित्र, आप्त, नातलग यांना वेळोवेळी जागेवर आणण्याचा व जागेवर विकसित कार्य राबविण्याचा पूर्ण हक्क आहे व राहील त्यास लिहून देणार यांनी कोणतीही हरकत घेण्याची नाही.